दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## जोगेश्वरी एसआरए प्रकरणी अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे निर्देश

**मुंबई :** जोगेश्वरी, गोरेगाव या भागात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) सदनिका वाटपात पात्र लाभार्थ्यांना डावलून घरे दिल्याच्या तक्रारींची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश एसआरए प्राधिकरणाला दिले. त्याचबरोबर ओशिवरा व्हीलेज येथील प्रकल्पात अपात्र लोकांना घरे वाटप केल्याप्रकरणी दोषी संबंधित एसआरएचे सक्षम प्राधिकारी, सहायक निबंधक या दोघा अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी आज येथे दिले.

## 'अवयवदानाबाबत राज्यभर व्यापक प्रबोधन मोहीम राबवा'

**मुंबई :** महाराष्ट्रात मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंमलात आल्यापासून आणि २०११ व २०१४ मधील सुधारित कायद्यांनुसार राज्यात अवयवदानाचा आलेख सातत्याने उंचावत असून हजारो रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. राज्य शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रादेशिक अवयव व उती प्रत्यारोपण समन्वय संस्था तसेच मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे राज्यभरात अवयवदानाबाबत मोठी सकारात्मकता दिसून येत आहे.

## थोडक्यात वार्ता

### 'कर्मचारी समाधान शिबिर'; 14 तक्रार अर्ज झाले दाखल

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आज विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली 'कर्मचारी समाधान शिबिर' अत्यंत उत्साहात आणि विहित वातावरणात पार पडले. शासन सेवेत कार्यरत असलेले तसेच सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक समस्यांचे संबंधित विभागांनी विनाविलंब निराकरण करावे आणि आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी, असे सक्त निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय आयुक्तांच्या विशेष दालनात आयोजित करण्यात आलेल्या या महत्त्वाच्या शिबिरास सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांच्यासह विविध संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या विशेष शिबिरामध्ये महसूल शाखेशी संबंधित सर्वाधिक ११, नगर परिषदेशी संबंधित ०१, विकास आस्थापनेशी संबंधित ०१ आणि नियोजन शाखेशी संबंधित ०१, असे एकूण १४ तक्रार अर्ज दाखल करण्यात आले.

### मनपात 7 सप्टेंबर रोजी 'लोकशाही दिनाचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांच्या तक्रारी व अडचणींचे निवारण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने 'लोकशाही दिन' ७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. मनपा मुख्यालयातील प्रशासकीय समिती कक्षात सकाळी वाजता महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली हा लोकशाही दिन पार पडणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या सुधारित परिपत्रकानुसार, लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर विहित नमुन्यात आणि आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर केलेल्या नागरिकांनाच ७ सप्टेंबर रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी असणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### सार्वजनिक गणेशोत्सवच्या अनुषंगाने प्रशासकीय व शांतता समितीची समन्वय बैठकीचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

आगामी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालय आणि प्रशासनाच्या वतीने एका महत्त्वपूर्ण समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. गणेश महासंघ, विविध सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि शांतता समितीच्या सदस्यांमध्ये योग्य समन्वय राखण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली आहे.

येत्या ०६ सप्टेंबर रोजी सकाळी वाजता बीड बायपास रोडवरील एमआयटी परिसरातील मंथन हॉलमध्ये ही बैठक पार पडणार आहे. या बैठकीला महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपरंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे आणि सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या समन्वय बैठकीस खासदार संदिपान भुमरे, खासदार कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य विक्रम काळे, सतीश चव्हाण, अंबादास दानवे, सुहास सिरसाठ, अविनाश गलांडे, तसेच विधानसभा सदस्य प्रदीप जैस्वाल, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, अनुराधा चव्हाण उपस्थित राहतील. यांच्यासह महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे देखील सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# फर्दापूर महाघोटाळा उघड अधिकाऱ्यांची चिरीमिरी अन् ग्रामपंचायतीचे सेटिंग फर्दापूरकरांना विषारी पाणी पाजण्याचा डाव

### सरकारी अहवालात बोअरवेल'चे पाणी पिण्यास अयोग्य; सॅम्पल नेऊन अहवाल फक्त 2 चाच कसा आला उरलेले 12 अहवाल दाबले

हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी

फर्दापूरकरांच्या जीवाशी सुरू असलेला सरकारी यंत्रणेचा आणि स्थानिक प्रशासनाचा भयंकर खेळ चव्हाट्यावर आला आहे छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक प्रयोगशाळेतून नुकताच पाण्याचा एक धक्कादायक अहवाल प्राप्त झाला आहे यामध्ये इब्राहिम खान बोअरवेल'चे पाणी रासायनिकदृष्ट्या पिण्यास पूर्णपणे अयोग्य Chemically Unfit ठरले आहे पाण्याला अत्यंत घाण वास येत असून त्यात क्षारांचे TDS प्रमाण भयंकर आहे. हे पाणी म्हणजे एक प्रकारचे 'स्लो पॉयझन'च आहे सय्यद अफसर बोअरवेलचे पाणी रासायनिकदृष्ट्या योग्य आढळले असले तरी त्याची बॅक्टेरियोलॉजिकल तपासणी बाकी आहे

पण खरा घोटाळा तर इथूनच सुरू होतो ते १२ रिपोर्ट कुठे गेले

हा अहवाल जेवढा भयंकर आहे त्यापेक्षा कितीतरी पट भयंकर आहे इथल्या अधिकाऱ्यांचा काळा कारभार गावात एकूण ५० बोअरवेल्स आहेत पण आरोग्य अधिकाऱ्यांनी नाटक करण्यासाठी फक्त १४ बोअरवेल्सचे सॅम्पल तपासणीसाठी नेले बरं १४ नेले तर अहवालही १४ यायला हवेत ना पण जाहीर केले फक्त २ बोअरवेलचे अहवाल!

मग उरलेले १२ बोअरवेलचे रिपोर्ट कुणाच्या दबावाखाली दाबून ठेवले आहेत त्या १२ बोअरवेल्सचे पाणी विषारी होते का ते रिपोर्ट दाबायला अधिकाऱ्यांनी किती चिरीमिरी लाच खाल्ली आहे आणि सर्वात महत्त्वाचे गावातल्या उर्वरित ३६ बोअरवेल्सचे पाणी तपासलेच का नाही

ग्रामपंचायतीच्या पाण्याला क्लीन चिट कुणी दिली साटेलोटे आहे का

दुसरी सर्वात धक्कादायक आणि संतापजनक बाब म्हणजे संपूर्ण फर्दापूर गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या फिल्टर पाण्याचे सॅम्पल तपासणीला गेलेच नाहीत का ग्रामपंचायतीचे पाणी थेट हिमालयातून येते का की ग्रामपंचायत आणि आरोग्य अधिकारी यांच्यात काही टेबलखालून व्यवहार झाला आहे ग्रामपंचायतीच्या पाण्यात लपवण्यासारखे असे काय आहे की त्याचे सॅम्पल घ्यायला अधिकाऱ्यांचे हात थरथर कापले हे 'सेटिंग' फर्दापूरकरांच्या जीवावर बेतू शकते

फर्दापूरकरांचे अधिकाऱ्यांना ५ सणसणीत सवाल

हिशेब द्या १४ सॅम्पलपैकी फक्त २ चा अहवाल आला उरलेले १२ अहवाल कोणत्या अधिकाऱ्याच्या खिशात लपवले आहेत

ग्रामपंचायतीला अभय का गावाला पाणी पाजणाऱ्या ग्रामपंचायतीच्या पाण्याचे सॅम्पल न घेण्यामागे कितीचा व्यवहार ठरला आहे

३६ बोअरवेल्सचे काय उर्वरित ३६ बोअरवेल्सचे पाणी न तपासता प्रशासनाने फर्दापूरकरांना मरणयातना भोगण्यासाठी वाऱ्यावर सोडले आहे का

डॉक्टरांचे मौन का जे पाणी पिण्यास अयोग्य आहे त्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आधीच सतर्क का केले नाही

कारवाई कोणावर लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या लाचखोर प्रवृत्तीवर प्रशासन निलंबनाची कारवाई कधी करणार

जनता रस्त्यावर उतरणार कार्यालयांना टाळे ठोकण्याचा इशारा

अहवालात अर्धे सत्य लपवून अधिकाऱ्यांनी फर्दापूरकरांचा विश्वासघात केला आहे जर येत्या २४ तासांत ग्रामपंचायतीसह सर्व ५० बोअरवेल्सच्या पाण्याची तातडीने तपासणी करून त्याचे सत्य अहवाल जनतेसमोर मांडले नाहीत तर फर्दापूरचे नागरिक थेट अधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन त्यांना हेच 'पिण्यास अयोग्य' पाणी पाजतील आणि कार्यालयांना टाळे ठोकतील असा अतिशय आक्रमक इशारा फर्दापूरच्या जनतेने दिला आहे

# दप्तराचे ओझे कमी होणार! 'स्कूल बॅग पॉलिसी 2020'ची काटेकोर अंमलबजावणी

**मुंबई :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करून शिक्षण प्रक्रिया अधिक आनंददायी, सुलभ व कृतीप्रधान करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'स्कूल बॅग पॉलिसी-२०२०' ची सर्व प्रकारच्या शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शारीरिक वजनाच्या साधारणतः १० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, याची काटेकोर दक्षता शाळांनी घ्यावी, असे शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे. जास्त वजनाच्या दप्तरामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीचा कणा, खांदे व शारीरिक वाढीवर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या धोरणानुसार, पूर्व-प्राथमिक वर्गातील लहान मुलांना शक्यतो शाळेत दप्तर आणण्याची आवश्यकता भासणार नाही, या दृष्टीने शाळांनी नियोजन करावे. मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दररोज अनावश्यक पाठ्यपुस्तके, वह्या किंवा इतर शैक्षणिक साहित्य आणण्यास सांगू नये, तसेच त्या दिवसासाठी आवश्यक असलेलीच पुस्तके आणली जावीत यासाठी वर्गनिहाय 'दप्तर वेळापत्रक' तयार करावे. याशिवाय, विद्यार्थ्यांनी दररोज सर्व पुस्तके घरी नेण्याची आवश्यकता भासू नये म्हणून शाळांनी वर्गखोल्यांमध्ये कपाटे, शेल्फ किंवा लॉकरची सुरक्षित व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. घरातून जड पाण्याची बाटली वाहून आणावी लागू नये यासाठी शाळांनी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि स्कूल बॅग पॉलिसीनुसार, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात १० दिवसांचा दप्तरविरहित कालावधी आयोजित करण्यात यावा. या कालावधीत स्थानिक कारागीर व व्यावसायिकांच्या मार्गदर्शनाखाली सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी बनविणे, हस्तकला, कृषीविषयक व स्थानिक व्यवसायांची ओळख यांसारखे प्रत्यक्ष अनुभवाधारित उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच वर्षभरात क्रीडा, बौद्धिक खेळ, वाचन, कथाकथन, पर्यावरण संवर्धन आणि क्षेत्रभेटी अशा कृतीप्रधान दिवसांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शाळांनी विद्यार्थ्यांच्या व दप्तराच्या वजनाची नियमित तपासणी करून त्याची नोंदवहीत नोंद ठेवावी आणि वजन निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास तत्काळ सुधारणा करावी. पालक सभांमधूनही पालकांना दप्तरात अनावश्यक वस्तू न ठेवण्याबाबत मार्गदर्शन करावे.

# मुसळधार पावसाने दिल्ली विमानतळ पाण्याखाली!

### टर्मिनलवर साचले पाणी, प्रवाशांचे हाल 'यलो अलर्ट' जारी

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, त्याचा मोठा फटका दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला (IGI Airport) बसला आहे. पावसानंतर विमानतळाच्या प्रवेशद्वाराबाहेर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याचे समोर आले आहे. जमिनीवर साचलेल्या पाण्यात प्रकाशाचे किरण परावर्तित होत असल्याचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले असून, या पाण्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

प्रवाशांचे हाल; ट्रॉली ढकलत अन् पायजमा दुमडून करावा लागला प्रवास

विमानतळ परिसरात साचलेल्या पाण्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली. अनेक प्रवासी पेंट/पायजमा दुमडून पाण्याच्या मधूनच आपल्या ट्रॉली ढकलत ॲराइव्हल (Arrival) गेट्सच्या दिशेने जाताना दिसले. "मी गेल्या अर्ध्या तासापासून येथे उभी आहे आणि पाणी थोडे ओसरण्याची वाट पाहत आहे. असा प्रकार मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता," अशी प्रतिक्रिया मानसी आणि हिमांशी या महिला प्रवाशांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. कृष्ण जन्माष्टमीच्या सणादरम्यानच पाऊस पडल्याने प्रवाशांची धावपळ अधिकच वाढली.

हवामान विभागाची (IMD) आकडेवारी अन् पावसाची नोंद

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) दिलेल्या ३ तासांच्या आकडेवारीनुसार, दिल्लीतील पालम भागात सकाळी ११.३० ते दुपारी २.३० दरम्यान ३.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर नजफगड परिसरात सकाळी ८.३० ते ११.३० दरम्यान ०.५ मिमी पाऊस पडला. दिल्लीतील इतर बहुतांश केंद्रांवर या कालावधीत पाऊस पडला नसला तरी, अचानक आलेल्या मुसळधार सरिमुळे सकल भागांत पाणी साचण्यास सुरुवात झाली.

दिल्लीला 'यलो अलर्ट'; वाहतूक कोंडीची शक्यता

विमानतळासह दिल्लीतील सखल भाग आणि अंडरपासमध्ये पाणी साचल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हवामान विभागाने संपूर्ण दिल्लीसाठी 'यलो अलर्ट' (Yellow Alert) जारी केला आहे. पावसामुळे रस्ते वाहतुकीवर मोठा

# फर्दापूर–तोंडापूर सिमेंट रस्त्याचे काम आठ महिन्यांपासून ठप्प!

### शेतकऱ्यांचा गंभीर आरोप; अडथळे निर्माण करणाऱ्यावर कारवाईची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता /शेख हक्कानी



**फर्दापूर :** जळगाव–छत्रपती संभाजीनगर मार्गावरील फर्दापूर ते तोंडापूर सिमेंट रस्त्याचे काम सुरू असताना अडथळे निर्माण केल्याचा आरोप करत फर्दापूर व वरखेडी खु. परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. रस्त्याचे काम मागील सुमारे आठ महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, अजिंठा परिसरातील अशोक देशमुख इसमाने रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण केल्यामुळे काम रखडले आहे. रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी जात असून, संबंधित शेतकऱ्यांनी सहकार्य केले आहे. मात्र, एका व्यक्तीच्या विरोधामुळे संपूर्ण रस्त्याचे काम खोळंबल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अपघातांचे सत्र; नागरिकांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर

रस्ता अपूर्ण असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे अर्जात नमूद आहे. या मार्गावर आतापर्यंत लहान-मोठे अनेक अपघात झाल्याचा दावा करण्यात आला असून, अपघातांमध्ये दोन व्यक्तींचा मृत्यू झाल्याचेही अर्जात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी जोर धरत आहे.

**महिला, दुचाकीस्वारांची कसरत :** फर्दापूर परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वरखेडी खु. परिसरात असल्याने त्यांना दररोज या मार्गावरून ये-जा करावी लागते. खराब व अपूर्ण रस्त्यामुळे महिला, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**छोटे-मोठे व्यवसायही अडचणीत :** या मार्गावरून वरखेडी खु. गावातील नागरिकांचा फर्दापूरशी मोठ्या प्रमाणात दैनंदिन व्यवहार आहे. रस्ता अपूर्ण असल्यामुळे फर्दापूरमधील छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांवरही परिणाम होत असून, उपजीविकेचा प्रश्न निर्माण होत असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.

**पोलिसांत तक्रार; आंदोलनाचा इशारा :** या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात फर्दापूर पोलिस ठाण्यात सामूहिक तक्रार देण्यात आल्याचे अर्जात नमूद आहे. नागरिकांनी संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करून रस्त्याचे काम सात दिवसांच्या आत सुरू करण्याची मागणी केली आहे. काम सुरू न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा अर्जदारांनी दिला आहे. तसेच, रस्त्याचे काम रोखण्यासाठी पुढे आंदोलन करून रस्ता रोखण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आता प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यासाठी काय भूमिका घेते, याकडे फर्दापूर–वरखेडी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वाहतनियम मोडणाऱ्यांची आता खैर नाही! थेट ड्रायव्हिंग लायसन्स होणार रद्द

**नवी दिल्ली :** देशातील रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि वाहतूक शिस्त बिघडवणाऱ्या वाहनचालकांवर कठोर चाप बसवण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी (Nitin Gadkari) यांनी वाहतूक व्यवस्थेत एक नवीन 'ग्रेडेड पॉइंट सिस्टीम' (Graded Point System) लागू करण्याचे संकेत दिले आहेत. या नवीन नियमानुसार, नियम मोडणाऱ्या चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स थेट रद्द किंवा निलंबित (Suspend) केले जाऊ शकते.

सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स (SIAM) च्या ६६ व्या वार्षिक परिषदेत बोलताना नितीन गडकरी यांनी या योजनेची माहिती दिली. या नव्या प्रस्तावित प्रणालीअंतर्गत, प्रत्येक वाहनचालकाचे उल्लंघन थेट त्याच्या ड्रायव्हिंग लायसन्सशी (DL) जोडले जाईल. जेव्हा जेव्हा एखादा चालक वाहतुकीचा नियम मोडेल, तेव्हा त्याच्या लायसन्स अकाउंटमधून ठराविक पॉइंट्स वजा केले जातील. पेनल्टीचे हे पॉइंट्स एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त वजा झाल्यास, संबंधित चालकाचे लायसन्स निलंबित करणे किंवा ते कायमस्वरूपी रद्द करण्याचा पूर्ण अधिकार वाहतूक विभागाला असेल.

उत्कृष्ट चालकांना मिळणार प्रोत्साहन आणि सवलती

ही यंत्रणा केवळ दंडात्मक कारवाईपुरती मर्यादित नसून, नियमांचे तंतोतंत पालन करणाऱ्या जबाबदार वाहनचालकांचा यात बहुमान केला जाणार आहे. ज्या चालकांचा ड्रायव्हिंग रेकॉर्ड पूर्णपणे स्वच्छ असेल, त्यांना विविध प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातील. यामध्ये वाहनांचा विमा काढताना किंवा रिन्यू करताना विमा कंपन्यांकडून विशेष प्रीमियम डिस्काउंट किंवा सवलती मिळण्याची शक्यता आहे.

# नेपाळ पूरात बेपत्ता व्यक्तींच्या ओळखीसाठी भारताची फॉरेन्सिक मदत, डीएनए तपासणी मोफत

**नवी दिल्ली :** नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरातील पीडितांची ओळख पटवण्याची प्रक्रिया जलद आणि सुलभ करण्यासाठी भारताने मोठे पाऊल उचलले आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, या आपत्तीत बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांसाठी भारतातील केंद्रीय आणि राज्यस्तरीय फॉरेन्सिक प्रयोगशाळांमध्ये डीएनए प्रोफाइलिंगची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपत्तीच्या या कठीण काळात भारत सरकारचा हा निर्णय पीडित कुटुंबीयांना आपल्या बेपत्ता नातेवाईकांचा शोध घेण्यास आणि त्यांची ओळख पटवण्यास मोठी मदत ठरणार आहे. भारतात राहणाऱ्या बेपत्ता व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांना या विशेष सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

## "शाल जोडे"




# पावसाच्या दडीने नुकसान झालेल्या पिकांची बांधावर जाऊन पाहणी



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड व सोयगाव तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर डोंगरगाव, पालोद, शिवना, डीग्रस, पानवडोद, धोत्रा, अजिंठा, अनाड तसेच सोयगाव, फर्दापूर, फर्दापूर तांडा, धनवट, जंगला तांडा आदी गावांच्या शिवारात प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली.

मका, कापूस, उडीद, मूग, सोयाबीन, टोमॅटो व मिरचीसह विविध खरीप पिकांना पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. यावेळी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्यांना धीर दिला."शेतकऱ्यांनी हताश होऊ नये, धीर धरावा. राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असा विश्वास शेतकऱ्यांना दिला.

नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या असून, एकही नुकसानग्रस्त शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करणार आहे.

शेतकरी अडचणीत असताना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच आपली जबाबदारी !या पाहणी दौऱ्यात तहसीलदार सागर वाघमारे, उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव, तालुका कृषी अधिकारी संदीप जगताप (सिल्लोड) भारत कासार (सोयगाव ) शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, जि.प. सदस्य देविदास पालोदकर, सय्यद नासेर हुसेन, राजूबाबा काळे, पंचायत समिती सदस्य शेख सलीम, मुरलीधर काळे, नानासाहेब रहाटे, गणेश पाटील, प्रवीण मिरकर, सोयगाव न.प. तील शिवसेना गटनेता अक्षय काळे, नगरसेवक संतोष बोडखे, राजू दुतोंडे, पालोद सरपंच नासेर पठाण, विनोद काटकर, पानवदोड सरपंच गजानन पन्हाळे, प्रमोद दौड, राजुमिया देशमुख, सय्यद कैसर, जीवनसिंग जाधव, इस्माईल कुरेशी, श्यामराव होळकर, सरपंच नाना दांडगे, तसेच कृषी विस्तार अधिकारी राजेंद्र लांडगे, जोगेंद्र आहेरराव, मंडळ कृषी अधिकारी गणेश इंगळे, सहाय्यक कृषी अधिकारी मीनाक्षी ढाकरे आदीसह लोकप्रतिनिधी, महसूल व कृषी विभागाचे अधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.


# सं पा द की य

## स्क्रॅप रिक्षांचा धोका आणि प्रवाशांची सुरक्षा

राज्यातील विविध शहरांमध्ये जुन्या, कालबाह्य आणि स्क्रॅप घोषित झालेल्या रिक्षा अवैधपणे रस्त्यावर धावत असल्याचे चित्र पुन्हा एकदा प्रशासनाच्या रडारवर आले आहे. नियमबाह्य पद्धतीने चालणाऱ्या या रिक्षा केवळ वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत नाहीत, तर प्रवाशांच्या जिवाला गंभीर धोका निर्माण करत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार वाहन परिवहन विभागाला येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम राबवून अशा स्क्रॅप रिक्षांवर कठोर कारवाई करण्याचे दिलेले निर्देश अत्यंत योग्य आणि वेळेवर उचललेले पाऊल आहे. कालबाह्य झालेल्या वाहनांची योग्य विल्हेवाट न लावता किंवा बनावट कागदपत्रांच्या आधारे ती पुन्हा रस्त्यावर आणणे हा प्रवाशांच्या सुरक्षेशी केलेला थेट खेळ आहे. या बेकायदेशीर रिक्षांमुळे अपघात घडण्याचा धोका तर असतोच, शिवाय कोणतीही अधिकृत नोंदणी नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीलाही खतपाणी मिळण्याची शक्यता असते. परिवहन आयुक्त आणि रिक्षा-टॅक्सी युनियनच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत मंत्र्यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रवाशांची सुरक्षितता हीच सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी. प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी (RTO) या मोहिमेत केवळ कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कठोर तपासणी करणे आणि नियमबाह्य वाहने जप्त करणे आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूला, नियमानुसार आणि प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या अधिकृत रिक्षाचालकांची प्रतिमा अशा काही बेकायदेशीर वाहनांमुळे मलीन होते. त्यामुळे रिक्षा संघटनांनीही अशा बेकायदेशीर चालकांना थारा न देता प्रशासनाला सहकार्य करणे गरजेचे आहे. परिवहन विभागाने आखलेली ही विशेष मोहीम केवळ ५ ऑक्टोबरपर्यंत मर्यादित न राहता, ही कारवाई निरंतर सुरू राहिली पाहिजे. जेव्हा RTO ची तपासणी यंत्रणा सतर्क राहील आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसोबतच फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, तेव्हाच खऱ्या अर्थाने रस्त्यांवरील हे अनधिकृत संकट दूर होईल आणि प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होऊ शकेल.

## बदलत्या शिक्षणव्यवस्थेतील शिक्षकाची भूमिका मार्गदर्शक

### तज्ज्ञ,उपक्रमशिल शिक्षणातून विद्यार्थी जडणघडण



नवीन शिक्षण धोरणामुळे शिक्षण अधिक कौशल्याधिष्ठित,सर्जनशील आणि विद्यार्थी-केंद्रित होण्यास नवी दिशा मिळाली आहे. उपक्रमशील व कृतीआधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांची जिज्ञासा, आत्मविश्वास, कल्पनाशक्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होत आहे. मात्र, अध्यापनासोबत शिक्षकांवर येणारा अवांतर प्रशासकीय कामांचा वाढता बोजा एकदम कमी करून त्यांना गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठी पुरेसा वेळ  देणे राष्ट्रहितासाठी महत्त्वाचे आहे. कालचा शिक्षक ज्ञानाचा प्रमुख स्रोत होता, तर आजचा शिक्षक ज्ञानाच्या अमर्याद विश्वात विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारा मार्गदर्शक बनला आहे.

तंत्रज्ञानाची साधने कितीही आधुनिक झाली तरी शिक्षकाचा मानवी स्पर्श, संवेदनशीलता आणि प्रेरणादायी भूमिका यांना पर्याय नाही. शिक्षक-विद्यार्थी नाते विश्वास, आदर, संवाद आणि आपुलकीच्या भक्कम पायावर उभे राहिले पाहिजे. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ परीक्षेतील गुण नसून विचारशील, सुसंस्कृत, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे हे आहे.

नवीन शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास

नवीन शैक्षणिक धोरणामुळे कौशल्याधारित, अनुभवाधारित व आनंददायी शिक्षणाला महत्त्व मिळाले आहे.आजचा शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यात विचारशक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास निर्माण करतो.मात्र शिक्षकांवर अध्यापनाव्यतिरिक्त विविध अवांतर व प्रशासकीय कामांचा बोजा वाढत आहे.त्यामुळे शिक्षकांना अनावश्यक कामांतून मुक्त करून अध्यापनासाठी अधिक वेळ व स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे.शिक्षक-विद्यार्थी नाते हे प्रेम, विश्वास, आदर आणि मार्गदर्शनावर आधारित असावे.

कालचा शिक्षक हा ज्ञान व संस्कारांचा दीपस्तंभ होता; आजचा शिक्षक तंत्रज्ञानस्नेही, विद्यार्थी-केंद्रित आणि परिवर्तनशील झाला आहे.

काळ बदलला तरी शिक्षकाचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील मार्गदर्शकाचे स्थान आजही तितकेच महत्त्वाचे आहे.

उपक्रमशील शिक्षणातून विद्यार्थ्यांना कृतीतून शिकण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतः विचार करण्याची संधी मिळते.

अशा शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्य, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो."समर्थ शिक्षक, समृद्ध विद्यार्थी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण" हेच विकसित समाज व सक्षम राष्ट्राचे खरे आधारस्तंभ आहेत-योगेश्वर निकम ,उपक्रमशिल शिक्षक


प्रत्येक विद्यार्थ्यातील सुप्त गुण ओळखून त्याला स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी देणे, ही शिक्षकाची खरी कसोटी आहे. आजच्या वर्गखोलीत घडणारा विद्यार्थीच उद्याच्या समाजाचे आणि राष्ट्राचे भविष्य घडवणार आहे. म्हणूनच शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून संस्कारांचा दीपस्तंभ आणि राष्ट्रनिर्मितीचा खरा शिल्पकार आहे-

**रवींद्र तायडे,**
**मुख्याध्यापक**
**महाराष्ट्र हिंदी विद्यालय**

# विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत परभणी जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

## पुढील टप्प्यातील कामे अधिक पारदर्शक व अचूकपणे करावीत : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी




**परभणी,– विशेष सखोल पुनरिक्षण -२०२६ अंतर्गत राज्यात परभणी जिल्ह्याचे काम अतिशय उल्लेखनीय झाले आहे. याबद्दल स्वत:** महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी कौतुक केले. दरम्यान, पुढील टप्प्यात करण्यात येणारी महत्त्वाची कामेही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक दक्षतेने व अचूक पध्दतीने करावीत, अशी सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात केली.

विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत परभणी जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मतदारांना प्रारूप यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून काही त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल करता येणार आहे. त्यानंतर दि. २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. तर अंतिम मतदार यादी दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

दावे व हरकती तसेच नो मॅपिंग, अनोमली प्रकरातील मतदारांच्या सुनावणी कागद पडताळणीबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, संगीता चव्हाण, शैलेश लाहोटी, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भोन्सीकर यांच्यासह मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत पुढील टप्प्यातील काम हे अतिशय जबाबदारीचे आहे. याबाबत भारत निवडणूक आयोग व महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाचे काटेकोर पालन करावे. प्राप्त दावे व हरकती सुनावणी घेण्याबाबतची कार्यपध्दती समजून घ्यावी. अंतिम मतदार यादी पारदर्शक व अचूक असेल याची दक्षता घ्यावी. प्रत्येक पात्र मतदाराची मतदार यादीत नोंद होईल आणि कोणत्याही अपात्र व्यक्तीचा समावेश होणार आहे, याची काळजी घ्यावी.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती संगेवार यांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणातंर्गत करण्यात येणाऱ्या पुढील बाबींबाबत उपस्थितांना सादरीकरणाव्दारे सविस्तर मार्गदर्शन केले.

**मतदारांना जिल्हाधिकारी यांचे आवाहन :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण-२०२६ (SIR) अंतर्गत परभणी जिल्ह्यातील चारही (जिंतूर, परभणी, गंगाखेड, पाथरी) विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून काही त्रुटी असल्यास किंवा पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विहित नमुन्यात दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

# मराठवाड्यात तुरळक व मेघगर्जनासह पावसाची शक्यता

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दिनांक 04 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी 30 ते 40 कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. दिनांक 04 सप्टेंबर रोजी जालना जिल्हयात वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक 04 सप्टेंबर रोजी परभणी जिल्हयात तर दिनांक 05 सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हयात तर दिनांक 06 सप्टेंबर रोजी जालना, हिंगोली, नांदेड जिल्हयात तर दिनांक 07 सप्टेंबर रोजी जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील पाच दिवसात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही व त्यानंतर हळूहळू वाढ होण्याची शक्यता आहे.

**हवामान सारांश / चेतावनी :**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दिनांक 04 सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी 30 ते 40 कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. दिनांक 04 सप्टेंबर रोजी जालना जिल्हयात वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक 04 सप्टेंबर रोजी परभणी जिल्हयात तर दिनांक 05 सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हयात तर दिनांक 06 सप्टेंबर रोजी जालना, हिंगोली, नांदेड जिल्हयात तर दिनांक 07 सप्टेंबर रोजी जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील पाच दिवसात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही व त्यानंतर हळूहळू वाढ होण्याची शक्यता आहे.

**सामान्य सल्ला :**

विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक 04 ते 10 सप्टेंबर दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा कमी, कमाल तापमान व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी तर दिनांक 11 ते 17 सप्टेंबर दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा कमी, कमाल तापमान सरासरीएवढे व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.

**संदेश :** पोटॅशियम नायट्रेटची (13|00|45) फवारणी सकाळच्या किंवा सायंकाळच्या वेळेत करावी. पिकात, बागेत, भाजीपाला व फुल पिकात अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार सुक्ष्म सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे.

पीक व्यवस्थापन

पाण्याची उपलब्धता असल्यास सोयाबीन पिकास आवश्यकतेनूसार सूक्ष्म सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. सोयाबीन पिकात पाण्याचा ताण बसत असल्यास 1% (100 ग्रॅम प्रति 10 लिटर) पोटॅशियम नायट्रेटची (13|00|45) फवारणी करावी. सोयाबीन पिकात पाने खाणाऱ्या अळीचा व खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास, याच्या व्यवस्थापनासाठी प्रोफेनोफॉस 50% 400 मिली किंवा इथिऑन 50% 600 मिली किंवा थायामिथॉक्झाम 12.6% + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन 9.5% (पूर्वमिश्रित किटकनाशक) 50 मिली किंवा प्रादूर्भाव खूप जास्त असल्यास क्लोरँट्रानिलीप्रोल 18.5% 60 मिली प्रति एकर यापैकी कुठलेही एक किटकनाशक पावसाची उघाड बघून फवारणी करावी. सोयाबीन पिकात पांढऱ्या माशीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी एकरी 10 ते 15 पिवळे चिकट सापळे लावावेत. सोयाबीन पिकात पिवळा मोझॅक या रोगाचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी पिकातील पिवळा मोझॅक प्रादूर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. सोयाबीन पिकावरील पिवळा मोझॅकच्या व्यवस्थापनासाठी अॅसिटामिप्रिड 25% + बाइफेन्थ्रीन 25% डब्ल्यू जी 100 ग्रॅम किंवा बीटा साइफ्लुथ्रीन 8.49% + इमिडाक्लोप्रीड 19.81% ओडी 140 मिली प्रति एकर यापैकी एका किटकनाशकाची पावसाची उघाड बघून याप्रमाणे फवारणी करावी व वरील किटकनाशकासोबत दुसरे कुठलेही औषध मिसळुन फवारू नये.

# आ. भुमरेंच्या जनता दरबारात अधिकाऱ्यांची कानउघडणी



**पैठण दि ०४ :-** पैठण तालुक्यातील शेतकरी तथा नागरिकांचे शासन दरबारी दिरंगाईने होत असलेल्या कामाबद्दल तालुक्याचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी तहसील कार्यालय सभागृहात अधिकाऱ्यांच्या उपस्थित जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार भुमरे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्यावर काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांना काम करा अथवा बदलीचा प्रस्ताव पाठवा अशी कानउघडणी केली.

तहसील कार्यालय सभागृहात आयोजित या जनता दरबारा प्रसंगी आमदार विलास बाप्पू भुमरे, एस.डी. एम नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटील,उप जिल्हा प्रमुख विनोद बोंबले, नंदलाल काळे,भूषण कावसणकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील,सां.बां. विभागाचे उप कार्यकारी अभियंता राजेंद्र बोरकर,कारखाण्याचे संचालक अप्पासाहेब निर्मळ,बिडीओ मानोरमा गयकवाड, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,स्वीय सहाय्यक सतीश अंधारे, अनिकेत धारकर, नगरसेवक राजू गायकवाड, गणेश वरकड, रमेश वीर,सुनील हिंगे आदींसह बिडकीन, पाचोड, पैठण एम.आय.डी.सी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची उपास्थिती होती.

जनता दरबारात आमदार भुमरे यांनी महसूल प्रमाणपत्रे, पुरवठा विभाग,रोजगार हमी, रेशम अनुदान, तालुक्यातील अवैध धंदे, अवैध वाळू उपसा,शेत रस्ता,गांव रस्ता मोजणी,घरकुल, शेतकरी आत्महत्या, जात प्रमाणपत्र, स्वछता,बळीराजा पानंद योजना,नवगांव स्मशानभूमी,पिंपळवाडी प्लॅट खरेदी फेरफार,पैठण शहरातील पाणीपुरवठा,सिसिटीव्ही,क्रीडा ट्रक,वन विभाग रस्ता,कृषी विभागाच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन,पीकविमा,फळबाग योजना,शेतकरी मित्र,पीएम किसान,कुत्रिम पाऊस, पोर्टलवर गावांच्या नावात बदल,जिप शाळा वर्ग खोल्या, दुरुस्ती, शौचालय,अभ्यासिका,राहाटगांव, थेरगांव,शेतीवर अतिक्रमण,विहामांडवा पोलीस चौकी हद्द प्रश्न,महावितरण योजना,सुरु असलेली कामे अश्या विविध बाबींचा आढावा घेत कामे करत नसलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई बाबत सूचना करण्याच्या सूचना दिल्या तसेच पैसे घेऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्याला नागरिकांचे पैसे परत कर नसता काम सोड असा सज्जड दम दिला. महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी पैठणला जनता दरबार भरेल असे यावेळी आमदार भुमरे म्हणाले. संदीप मडके, राजू मापारी, मनीष औटे,सुरज नागोरी,ऋषी दहिभाते पप्पू खोचे,,बाबा घटे, ऋषीं अय्यर, गजू इच्छय्या सह यावेळी जिप, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उप सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, पाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठया संख्येने उपस्तित होते.

# इंद्रध्वज मंडल विधानात भक्तिभावाने धार्मिक अनुष्ठान विविध धार्मिक विधी पूजन व आरतीला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आर्यनंदी कॉलनी येथील श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिरात आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या मंगल सान्निध्यात सुरू असलेल्या इंद्रध्वज मंडल विधानाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विविध धार्मिक विधी, पूजन, अभिषेक व आरतीमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

आज सकाळी भगवानांच्या शांतिधारेचे सौभाग्य सौ. अल्का वर्धमानजी कासलीवाल (मुंबई) यांना लाभले. तसेच आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या पादप्रक्षालनाचे सौभाग्य श्री अरुणजी मयूरजी पाटनी परिवारास मिळाले. पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, विश्वस्त अरुण पाटणी, विश्वस्त संतोष सेठी व प्रमोद ठोळे यांनी मंदिरात भेट देऊन इंद्रध्वज विधान व आचार्य श्रींचे दर्शन घेतले.

**धर्म म्हणजे आत्मशुद्धीचा मार्ग :** आचार्य हेमसागरजी महाराज

प्रवचनातून आचार्य हेमसागरजी महाराज यांनी धर्म हा केवळ बाह्य विधीपुरता मर्यादित नसून आत्मशुद्धी, संयम व सद्विचारांचा मार्ग असल्याचे सांगितले. अहंकाराचा त्याग, सर्व जीवांप्रती मैत्रीभाव आणि अहिंसेचे पालन हीच खरी धार्मिक साधना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संध्याकाळी सौ. जयश्री पूनमचंदजी अग्रवाल परिवाराच्या सौभाग्याने सामूहिक आरती पार पडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंदिर समिती, विधान मंडळाचे पदाधिकारी, महिला मंडळ व जैन समाजबांधव परिश्रम घेत आहेत.

# एलोरा इंग्रजी स्कूलमध्ये श्रीकृष्णजन्माष्टमी उत्साहात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर:-** बीड बायपास रोड वरील एलोरा इंग्रजी हायस्कूल व ज्यू. कॉलेजमध्ये श्रीकृष्णजन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली अश्विनी काळे यांनी श्रीकृष्णाच्या विविध लीला विषयी विदयार्थ्यांना माहिती दिली. यावेळी प्रणय शिंदे, निशांत मोरे, वेदिका जाधव, ध्रीती चव्हाण, प्रज्वल अवसरमोल, सृष्टी दांडगे, जान्हवी वाघ, रूद्र राठोड, अपूर्वा मुंढे, आरोही बांगर, समंथा कतोरे, त्रिशा लिंगायत, ओवी आगलावे, षिवांष जाधव या विदयार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच गोप-गोपीच्या वेशभूषेमध्ये सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढविली. हाथी घोडा पालखी जय कन्हैया लाल की च्या घोषणा देत दहीहंडी फोडून गोपाळकाल्याचा आनंद लुटला विदयार्धीनींनी 'अच्युतम केशवम्' गीताद्वारे वातावरण भक्तीमय केले मुख्याध्यापिका संगीता प्रल्हाद षिंदे, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरजीतकौर सौदी, निलाक्षी राव, अश्विनी काळे, पुजा शेळके, स्नेहा जोहरे, सोनाली भोने, मनिषा फुलारे, सोनल कानेड, सुवर्णा क्षीरसागर, सचिन काळे, दत्तात्रय गवारे, हिरा पवार, इत्यादीनी परिश्रम घेतले.

## प्रल्हाद गणपतराव महापुरे यांचे निधन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-७ भागातील डॉ. आंबेडकर नगर, गल्ली क्र. १४ मधील रहिवासी प्रल्हाद गणपतराव महापुरे (वय ६९) यांचे गुरुवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले (कल्याण, अविनाश आणि योगेश), दोन मुली (संगीता सुरडकर व वैशाली), जावई आणि नातवंडांचा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल परिसरामध्ये शोककळा पसरली असून, त्यांच्या पार्थिवावर उद्या, दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी शनिवार दुपारी वाजता डॉ. आंबेडकर नगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## कै. प्रभाकर सखाराम पाटील (नागदकर)



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजी नगर येथील छत्रपती शिवाजीनगर येथील रहिवासी प्रभाकर सखाराम पाटील यांचे आज दि.04/09/2026रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. अंत्यविधीचा कार्यक्रम संध्याकाळी 5.00 वा. गादी या विहार स्मशानभूमी शिवाजीनगर छत्रपती संभाजी नगर करण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, सुना, नातवंडे, 2 मुले रवींद्र प्रभाकर पाटील, राहुल प्रभाकर पाटील हे आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# मनपाचे 12 शिक्षक 'आदर्श शिक्षक पुरस्कारा'साठी यादी जाहीर; 17 सप्टेंबरला होणार सन्मान

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने यंदाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, मनपा शाळांमधील एकूण १२ शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये मराठी माध्यमातील १० आणि उर्दू माध्यमातील २ शिक्षकांचा समावेश असून, १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित मुख्य सोहळ्यात या सर्व शिक्षकांना गौरविण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सध्या एकूण ३९८ शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अर्जांची उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने कसून छाननी केली आणि त्यातून या १२ गुणवंत शिक्षकांची अंतिम निवड केली.

या पुरस्कारासाठी मराठी माध्यमातून मनोज अग्रवाल, तेजस्विनी देसले, नंदा गटकळ, योगेश वैष्णव, किरण तबडे, सविता भांबर्डे, नीता चव्हाण, उमा पाटील, विद्युलता गोरे आणि कल्पना पाटील यांची निवड झाली आहे. तसेच उर्दू माध्यमातून अर्शद सिद्दीकी आणि शमीम बेगम या दोन शिक्षकांना या पुरस्कारासाठी-पसंती मिळाली आहे.

येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महानगरपालिकेत आयोजित विशेष कार्यक्रमात महापौर समीर राजूरकर, मनपा आयुक्त अमोल येडगे आणि इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते या सर्व आदर्श शिक्षकांना सन्मानचिन्ह व पत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# भारतीय ज्ञान परंपरा'वर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन सात सत्रात 80 शोधनिबंध सादर होणार

**छत्रपती संभाजीनगर, :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने येत्या ८ व ९ सप्टेंबर रोजी 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसात सात सत्रात ८० शोधनिबंध सादर होणार देशभरातून तज्ज्ञांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती कुलसचिव तथा विभागप्रमुख डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या सिफार्ट सभागृहात हे चर्चासत्र होणार आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चासत्राचा विषय व सत्र ठरविण्यात आले आहेत. 'रिव्हिजीटींग पॉलीटिकल थॉट ॲण्ड इंडिजीनस पॉलीटी थ्रू द लेन्स ऑफ इंडियन नॉलेज सिस्टीम' हा चर्चासत्राचा मुख्य विषय आहे. चर्चासत्राचे उद्घाटन येत्या मंगळवार (दि.आठ) सकाळी १०ः३० वाजता सिफार्ट सभागृहात होणार आहे. या चर्चासत्रासाठी आयसीएसएसआरचे माजी अध्यक्ष प्रा.जे.के.बजाज हे व प्रा.संजीवकुमार शर्मा (महासचिव आयपीएसए) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्रा.ब्रिजेंद्र पांडे यांचे बीजभाषण आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी हे या सोहळयाचे अध्यक्ष आहेत. तर समारोप बुधवारी (दि.नऊ) दुपारी तीन वाजता होणार आहे. यावेळी माजी कुलगुरु प्रा.मनोज दीक्षित, अधिष्ठाता डॉ.धनश्री महाजन यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते हे अध्यक्ष असणार आहेत. पहिल्या दिवशीच्या विविध सत्रात डॉ.विठ्ठल दहिफळे, डॉ.रमेश पांडव, प्रा.प्रशांत पौळ, डॉ.अनुसया जैन, डॉ.अश्विन रांजणीकर, प्रा.सुरेंद्र जोंधळे, प्रा.श्रीराम येरळकर, डॉ.मृदुल निळे हे सहभागी होणार आहेत तर दुस-या दिवशीच्या सत्रात प्रा. मकरंद पैठणकर, प्रा.जितेंद्र वासणिक, प्रा.दत्तात्रय वाबळे, प्रा.सुधीर वाडेकर हे सहभागी होणार आहेत. दोन दिवसात एकुण सात सत्रात हे चर्चासत्र होणार आहे.तर या संदर्भात १४ उपविषयावर परिषदेसाठी ८० शोधनिबंध प्राप्त झाले आहेत. परिषदेत एकुण ८० शोध निबंध सादर करण्यात येणार आहे.

# गाय वासराची पूजन करुन श्रीकृष्ण जयंती ज्ञानेश्वर महाराज जयंती साजरी



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** गौरक्षक सेना - वीर वारकरी सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव दोन्हींचे जन्मोत्सव च्या निमित्ताने फिरत्या गाय वासराची पूजा करून उत्साहात जन्मोत्सव साजरा भगवान श्रीकृष्ण गोमाता गोसंवर्धन सेवा सर्वात आवडणारी असणारे गोमाता यांची पूजा करून बालगोपाल गोमातेचे खूप महत्त्व आहे गायीचे गोमूत्र शेण दही दूध ताक तूप लोणी अनेक आयुर्वेदिक ला महत्त्व असते म्हणून गो संवर्धन हे प्रत्येकाने आपापल्या परिसरामध्ये फिरत्या गोमातेची सेवा केली पाहिजे आणि ज्ञानेश्वर महाराज यांची ज्ञानेश्वरी ग्रंथ किंवा हरिपाठ त्यांचे व्यक्तीने माने पारायण केले पाहिजे असे आव्हान जनजागृतीच्या माध्यमातून करण्यात येत आहे यावेळी गौरक्षक सेना प्रदेश मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, रुद्राक्ष आवटे विशेष करून कृष्णाच्या पोशाख धारण करून बालगोभक्त रितेश आवटे पाटील, हेही आवर्जून उपस्थित होता गोमाता गोसंवर्धन गोपाल श्रीकृष्ण भगवान की जय ज्ञानेश्वर महाराज की जय घोषणा देऊन कार्यक्रम रामकृष्ण नगर परभणी संपन्न झाला अशी माहिती वीर वारकरी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वरी पारायण प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

# श्री संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त मंगळवारी ह.भ.प. सायली ताई राऊत यांचे कीर्तन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**वाळूज महानगर :** समस्त नाभिक समाज मंडळ रांजणगाव शेणपुंजी, तालुका गंगापूरच्या वतीने श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त, मंगळवार दि. 8 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता, रावते मंगल कार्यालय, शिवनेरी कॉलनी, रांजणगाव शेणपुंजी येथे भागवताचार्य ह.भ. प. सायली ताई राऊत महाराज (श्री कल्याण स्वामी संस्थान चकलंबा, ता. गेवराई, जि. बीड) यांचे हरी किर्तन होणार असल्याची माहिती नाभिक समाज मंडळाचे अध्यक्ष नितीन नाईक, उपाध्यक्ष दत्तात्रय पंडित यांनी दिली.

श्री कल्याण स्वामी आश्रम, चकलांबा, तालुका गेवराई, जिल्हा बीड च्या संस्थापक ह. भ. प. साध्वी सोनाली दीदी कर्पे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, मिती श्रावण कृ.12 शके 1948, मंगळवार दि. 8 सप्टेंबर रोजी होणाऱ्या या हरी कीर्तनाचा लाभ रांजणगाव शेणपुंजी व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व नाभिक समाज बांधवांनी घ्यावा असे आवाहन यावेळी नाभिक समाज मंडळाचे अध्यक्ष नितीन नाईक, उपाध्यक्ष दत्तात्रय पंडित सदस्य संदीप शेजुळ, विक्रम शेजुळ, दिलीप पंडित, कैलास पंडित व नागेश कोंडामंगल यांनी केले आहे.

ह.भ.प. सायली ताई राऊत महाराज यांच्या हरिकीर्तनास मृदंगाचार्य ह.भ.प. सचिन महाराज राऊत, गायनाचार्य ह. भ. प. स्नेहल ताई तैनाक व ह.भ.प. तनुजाताई घुगे या संगीत साथ देणार आहेत गायन व संगीत साथ देणार आहेत.

# प्रशिक्षणातून आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर

## गरजाधारित वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करण्याच्या सूचना; संचालक डॉ. योगेंद्र सवई यांचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, कौशल्ये आणि व्यावसायिक क्षमता वृद्धिंगत करून नागरिकांना अधिक गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी गरजाधारित वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करावा, अशा सूचना राज्य आरोग्य व कुटुंब प्रशिक्षण संस्था, नागपूरचे संचालक डॉ. योगेंद्र सवई यांनी दिल्या.

डॉ. सवई यांनी नुकतीच विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे सदिच्छा भेट देऊन विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशिक्षण केंद्रातील उपलब्ध सुविधा, प्रशिक्षणाची सद्यस्थिती, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा तसेच आगामी प्रशिक्षण नियोजनाची माहिती घेतली.

आरोग्य क्षेत्रात सातत्याने होत असलेले तांत्रिक व प्रशासकीय बदल, नवीन आरोग्य कार्यक्रम, डिजिटल आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नियमित कौशल्यवर्धन, पुनर्तार्जगी प्रशिक्षण आणि विषयाधारित प्रशिक्षणांचे नियोजन आवश्यक असल्याचे डॉ. सवई यांनी स्पष्ट केले.

करमाड येथील प्रस्तावित संस्थेच्या जागेची पाहणी

विभागीय प्रशिक्षण केंद्राच्या आढाव्यानंतर डॉ. सवई यांनी करमाड येथे प्रस्तावित राज्य आरोग्य प्रशिक्षण संस्थेच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रस्तावित संस्थेचे बांधकाम, उपलब्ध भौतिक सुविधा, प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, प्रशासकीय व्यवस्था तसेच भविष्यातील प्रशिक्षणाच्या वाढत्या गरजांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.


प्रशिक्षण संस्थेच्या विकासात आधुनिक प्रशिक्षण पद्धती, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल प्रशिक्षण सुविधा आणि प्रशिक्षणार्थींसाठी आवश्यक सोयी-सुविधांना प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

आरोग्य विभागातील मनुष्यबळाचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता सातत्याने वृद्धिंगत झाल्यास आरोग्य सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यास मदत होईल. त्यामुळे बदलत्या आरोग्य गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात यावा, असेही डॉ. सवई यांनी सांगितले.

यावेळी आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. संतोष कडले यांच्यासह आरोग्य विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एमजीएम विद्यापीठात 'सुपरनोव्हा' तांत्रिक महोत्सवाला प्रारंभ

## विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना मिळणार व्यासपीठ; नऊ तांत्रिक स्पर्धांचे आयोजन




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे आयोजित 'सुपरनोव्हा - स्पार्क द फ्युचर २.०' या दोन दिवसीय तांत्रिक महोत्सवाला शुक्रवारी उत्साहात प्रारंभ झाला. रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत डिजिटल पद्धतीने महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी बागला ग्रुपचे अध्यक्ष ऋषिकुमार बागला, टोयोटा त्सुशो इंडियाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्रीकांत पात्रा, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच. शिंदे आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका प्रो. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

ऋषिकुमार बागला यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवून सातत्याने शिकत राहावे, प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळवावे आणि नवकल्पनांवर भर द्यावा, असे आवाहन केले. श्रीकांत पात्रा यांनी समस्यांच्या मुळाशी जाऊन त्यावर प्रभावी उपाय शोधण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असे सांगितले.

कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून कौशल्ये विकसित करण्याचे आवाहन केले. कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी 'अप्पो दीपो भव' या ब्रीदवाक्यानुसार विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा प्रकाश समाजाच्या प्रगतीसाठी वापरावा, असे नमूद केले.

संचालिका प्रो. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी महोत्सव हा विद्यार्थी-केंद्रित असून विद्यार्थ्यांनी दोन महिन्यांपासून मेहनत घेतल्याचे सांगितले. महोत्सवात स्टेलर, प्रोटोनोव्हा, कॉस्मोबोल्ट, स्पार्क्स, कोडबर्स्ट, ज्युनियर शार्क्स, निंजा कोडर्स, इन्फिनिटी लॅब आणि बॅटलक्लिप्स या नऊ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# वाहतूक नियमांबाबत जनजागृतीसाठी सोयगाव पोलीस ठाण्यातर्फे चित्रकला स्पर्धा संपन्न

## सपोनि दिनकर गोरे व कृषीभूषण अरुण सोहनी यांच्या शुभहस्ते विजेत्यांना बक्षिसे देऊन सत्कार

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.४ सप्टेंबर



विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती व्हावी तसेच सुरक्षिततेचा संदेश चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचावा,या उद्देशाने सोयगाव पोलीस ठाण्याच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी 'वाहतूक नियम पाळू या, अपघात टाळू या' तसेच 'हेल्मेट व सीट बेल्ट जीवनाचे सुरक्षा कवच' हे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आकर्षक चित्रे साकारत वाहतूक सुरक्षिततेचा प्रभावी संदेश दिला.स्पर्धेत प्रथम क्रमांक वेदांत शरद पवार (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव) याने मिळविला. द्वितीय क्रमांक सपना राठोड (कै.वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय,निबायती तांडा) हिने,तर विभागून द्वितीय क्रमांक अक्षरा दयानंद पवार (जिल्हा परिषद प्रशाला,सोयगाव) हिने पटकावला.तृतीय क्रमांक पूजा संजय पाटील (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव) हिने मिळविला. या विजेत्या विद्यार्थ्यांचा सोयगाव पोलीस ठाण्यात शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व कृषिभूषण अरुण सोहनी यांच्या शुभहस्ते विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलीस कर्मचारी गजानन दांडगे,पालक शरद पवार,वैशाली पवार,मुख्याध्यापक हरिदास काटोले,भास्कर चौधरी,किरणकुमार पाटील, रामचंद्र महाकाळ,विवेक महाजन यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे महत्त्व, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण झाली.सोयगाव पोलीस ठाण्याच्या या सामाजिक उपक्रमाचे पालक व नागरिकांनी कौतुक केले.

# पारध पोलीसांच्या मदतीने मनोरुग्णास उपचारासाठी माणुसकी टिम चे मदतकार्य

## पद्मावती परिसरात दहशितीचे वातावरण निर्माण करीत होते मनोरुग्ण



**अजिंठा प्रतिनिधी :** पारध ता.भोकरदन पोलीस स्टेशन हद्दीतील पद्मावती गावातील सदर मनोरुग्ण व्यक्ती नामे किरण गायकवाड

सदर व्यक्ती हा हिंसक वागत आहे.व रात्री बेरात्री परिसरात फिरतो जोरजोरात ओरडतो पत्नी ला सतत शिवीगाळ व मारहाण करतो व चाकुचा धाक दाखवून पैसे उगळने असे कृत्य तो करत होता त्यापासून लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे.व तो बऱ्याच दिवसापासून मनोरुग्ण सारखे वागत आहे. त्यास या आधी पोलीसांनी वेळोवेळी जावुन समज दिल्या त्याने या आधी संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात सुध्दा तोडफोड केली होती. त्यास या आधी दोन वेळा प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा पुणे येथे उपचारासाठी दाखल केले होते तो औषधोपचार घेत नसल्याने त्याचा मानसिक आजार आता जास्त झाल्याने तो धिंगाणा घालत आहे.पारध पोलीसांनी सदर मनोरुग्णासाठी काम करणाऱ्या सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेचे समाजसेवक सुमित पंडित यांना माहिती दिली.

सुमित यांनी तात्काळ पारध पोलीस स्टेशन येथे जाऊन परिसरात पेशंट ला शोधुन शाहनीशा केल्यावर सदर रुग्णांना ताब्यात घेणे मोठे अवघड झाले होतो.

ते हिंसक वृत्ती चे असल्याने कोन्हाला जवळहि येवुन देत नव्हते सदर मनोरुग्णांना उपचारासाठी पुणे येथे घेऊन जाने सोपे नव्हते सुमित पंडित यांनी शासकीय रुग्णालय घाटि मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टर गौतम खुबनानी यांचा सल्ला घेतला व पारध पोलीसांच्या मदतीने त्यास माणुसकी समुहाच्या टिम ने हात पाय बांधून ताब्यात घेतले व शासकीय रुग्णालय संभाजीनगर घाटी रुग्णालयातील मानसोपचारतज्ज्ञ यांनी औषधोपचार करून त्यास पुढिल उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे नेण्याचा सल्या डॉंक्टरांनी दिल्यानंतर कायदेशीर कागदोपत्री पुर्तता करुन त्यास येरवडा पुणे येथे अँबुलंस वाहनाने उपचारासाठी माणुसकी टिम च्या सभासदांनी मदतकार्य करुन उपचारासाठी दाखल केले.यात संतोष माने सहाय्यक पोलीस निरीक्षक पारध पोलीस स्टेशन,यांच्या मार्गदर्शनाखाली वाल्मिकी नेमाने उपपोलीस निरीक्षक,अँबुलंस डि.एम.अतुल मुरुडकर,ए डि.एम.सचीन पालवे,जालींदर जाधव,डॉ विशाल आगळे आदिंनी मदतकार्य केले,

# शिक्षक दिनाच्या औचित्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी येथे स्वयंशासित दिन




**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील मादणी येथे शिक्षक दिनाच्या औचित्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी येथे आज दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी स्वयंशासित दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन, नेतृत्व, निर्णयक्षमता, जबाबदारी आणि शिस्त यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

स्वयंशासित दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षक व शालेय प्रशासनाच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळत शाळेचे दैनंदिन कामकाज आत्मविश्वासाने पार पाडले. विद्यार्थ्यांनी अध्यापन, वर्गव्यवस्थापन, शिस्त, प्रार्थना, विविध शैक्षणिक उपक्रम तसेच शालेय कामकाजात सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रभावी अंमलबजावणी श्री. अजय जेऊघाले सर यांनी केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी स्वयंशासित दिन हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी विकसित करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

या प्रसंगी इयत्ता 7वी ची विद्यार्थिनी दिव्या कालभिले ही मुख्याध्यापक तर वेदिका अपार हिने उपमुख्याध्यापकाची भूमिका पार पाडली. इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका अत्यंत उत्साहाने आणि जबाबदारीने पार पाडल्याने शाळेतील वातावरणात उत्साह निर्माण झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना "जबाबदारी आमची, निर्णय आमचे आणि शाळेच्या विकासात सहभाग आमचा" या भावनेचा अनुभव मिळाला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव चोरमले, रमाकांत जाधव, भूषण पाटील, अजय जेऊघाले, शोभा दांडगे, माधुरी पखान, शकील अहमद, जफर कुरेशी आदी शिक्षकांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी येथील हा अभिनव उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला.

# सपोनि रवींद्र ठाकरे यांचा लोकशाही मराठी सन्मान पुरस्काराने गौरव

## लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सन्मान



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.श्री. रविंद्र प्रेमसिंग ठाकरे कार्यरत असलेले सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट पर्यंत विविध गावात साजरी करण्यात आलेली लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम,समाज प्रबोधन कार्यक्रम तसेच मिरवणुक कार्यक्रमासाठी चोख बंदोबस्त देऊन स्वतः सक्रीय सहभाग नोंदवुन सर्व जयंती महोत्सव शांततेत पार पाडण्यास सहकार्य केले तसेच ते करत असलेल्या पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल व समाज सेवेतील योगदानाबद्दल त्यांना लहुजी क्रांती सेना सिल्लोड तालुका तसेच लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती वांगी बु. यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही मराठी सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी लहुजी क्रांती सेनेचे प्रदेश अध्यक्ष अशोकराव कांबळे, लहुजी क्रांती सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष सखाराम आहीरे, मराठवाडा अध्यक्ष नानासाहेब गायकवाड, जिल्हा समन्वयक विष्णु सौदागर, संघटनेचे सिल्लोड तालुका अध्यक्ष संजय कांबळे, युवा कार्यकर्ते दिलीप कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग-2027'मध्ये युवकांना राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग-२०२७' या राष्ट्रीय उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना यात सहभागी होता येणार असून, 'विकसित भारत क्विझ'ला सुरुवात झाली असून, ३० सप्टेंबर २०२६पर्यंत सहभागी होता येणार आहे.

उपक्रमात विकसित भारत चॅलेंज, सांस्कृतिक विभाग, डिझाईन फॉर भारत, हॅक फॉर सोशल कॉज, युवा उद्योजक चॅलेंज आणि युवा संसद अशा सहा विभागांचा समावेश आहे. क्विझनंतर निबंध, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय निवड प्रक्रियेतून युवकांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील अंतिम कार्यक्रम १० ते १२ जानेवारी २०२७ रोजी नवी दिल्ली येथे होणार असून, निवड झालेल्या युवकांना राष्ट्रीय नेतृत्वासमोर आपल्या कल्पना मांडण्याची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी माय भारत (MY Bharat) पोर्टलवर नोंदणी करून सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी केले आहे.

# पीएम विश्वकर्मा योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी विशेष कर्ज मेळावे

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत कर्जासाठी प्रस्ताव दाखल केलेल्या; मात्र अद्याप बँकेपर्यंत पोहोचू न शकलेल्या तसेच बँकेशी संपर्क होऊनही कर्जाची प्रक्रिया पूर्ण न झालेल्या लाभार्थ्यांसाठी परभणी जिल्ह्यात विशेष कर्ज मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या पुढाकाराने आयोजित या मेळाव्यांमध्ये संबंधित लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासून बँकांमार्फत कर्जप्रकरणांची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकूण ६५२ लाभार्थ्यांचा समावेश आहे. योजनेतील प्रलंबित लाभार्थ्यांसाठी जिंतूर (दि.९), परभणी (दि.१०) आणि पुर्णा (दि.१६) येथे मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी संबंधित तालुक्यातील लाभार्थ्यांनी निर्धारित तारखेला आधार कार्ड, पॅन कार्ड आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून कर्जप्रकरणाची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठवाड्यातील क्रीडा संकुले आधुनिक सुविधांनी सज्ज करा; विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मराठवाड्यातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच ऑलिम्पिकसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धांसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने विभागातील सर्व विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुले आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन सर्वंकष विकास आराखडा तयार करावा आणि त्याचा नियमित पाठपुरावा करावा, असे सांगतानाच क्रीडा संकुलांच्या विकासासाठी येणाऱ्या अडचणींचे विभागीय पातळीवर तातडीने निराकरण करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयातील दालनात मराठवाड्यातील क्रीडा संकुलांच्या अद्ययावतीकरणाबाबत विभागातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. यावेळी छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक शेखर



पाटील, लातूर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक मिलिंद दीक्षित यांच्यासह जालना, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी व प्रभारी अधिकारी उपस्थित होते. बैठकीत क्रीडा संकुलांसाठी आवश्यक जमीन, उपलब्ध निधीचा विनियोग, चालू कामांची प्रगती आणि अतिरिक्त निधीची मागणी यावर सखोल चर्चा करण्यात आली.

प्रत्येक जिल्ह्यात विविध खेळांतील उत्कृष्ट खेळाडू घडवण्यासाठी स्थानिक स्तरावर नियमित क्रीडा स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे असल्याचे नमूद करत जी. श्रीकांत यांनी खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करण्यावर भर दिला. ज्या जिल्ह्यांत अद्याप सिंथेटिक ट्रॅक उपलब्ध नाहीत, त्यांनी ते उभारण्यासाठी तातडीने सर्वंकष विकास आराखडा तयार करावा. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर करून प्राधान्यक्रम ठरवावेत आणि वास्तुविशारदांमार्फत उच्च दर्जाचे प्रस्ताव पुढील दहा दिवसांत सादर करावेत, अशा सक्त सूचना त्यांनी दिल्या.

सध्या सुरू असलेल्या क्रीडा संकुलांच्या कामांची गुणवत्ता राखण्यासाठी ड्रोनद्वारे पाहणी करून छायाचित्रे व व्हिडिओ संकलित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धांच्या आयोजनासोबतच क्रीडा संकुलांमधील स्वच्छतागृहे अत्यंत स्वच्छ ठेवणे बंधनकारक केले आहे. सर्व शासकीय कार्यालयांप्रमाणेच आता दर सोमवारी सकाळी १० ते ११ या वेळेत क्रीडा संकुल परिसरातही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. क्रीडा परिसराची नियमित देखभाल, दुरुस्ती, हिरवळ टिकवण्यासाठी पाण्याची व्यवस्था आणि स्वतंत्र पाणीशुद्धीकरण केंद्र उभारण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

बैठकीच्या उत्तरार्धात सर्व आठही जिल्ह्यांच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील तालुकानिहाय क्रीडा संकुलांची सद्यस्थिती, अडचणी आणि प्रस्तावांची माहिती सादर केली. विभागस्तरावरील या बैठका यापुढेही नियमित पार पडणार असून, छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक शेखर पाटील हे या संपूर्ण समन्वयाची जबाबदारी पार पाडणार आहेत. मराठवाड्यातील तरुणांना सकारात्मक दिशा मिळून या भागातून जागतिक पातळीवरील खेळाडू घडवण्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन विभागीय आयुक्तांनी या बैठकीच्या माध्यमातून केले.

# डॉल्बी साउंड सिस्टीम वर व डीजेवर कायद्याने बंदी. पो.अ. पंकज कुमार यांचे आदेश

हिंदू प्रकाश वार्ता

**परभणी:** संपूर्ण महाराष्ट्रभर डीजे च्या विरोधात आंदोलन चालू असताना परभणी जिल्हा का अपवाद का ठरावा सण उत्सव काळामध्ये डीजे डॉल्बी सिस्टीम वर पोलिसांनीबंदी घातली आहे पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी आदेश काढले आहेत यामध्ये चार सप्टेंबर ते 25 सप्टेंबर या कालावधीत श्रीकृष्ण जन्माष्टमी दहीहंडी पोळा गणेशोत्सव आधी सण व उत्सव साजरे करण्यात येणार आहेत या काळात कर्कश ध्वनी व काळजात धडकी भरवणारा डीजेचा आवाज यामुळे लहान बालके वयोवृद्ध महिला व मुली यांना यांचा त्रास सहन करावा लागतो म्हणून सण उत्सवाच्या काळात जिल्ह्यातील डॉल्बी चालक व मालक यांच्याकडे असलेल्या डॉल्बी सिस्टीम वर उत्सव कालावधीत नियंत्रण ठेवणे खूप गरजेचे आहे सदरचा सिस्टीम कब्जा असलेल्या ठिकाणच्या जागेवरच सील बंद करून प्रतिबंध



करण्याकरिता चालक-मालक यांच्यावर भारतीय सुरक्षा संहिता 163 नुसार बंदी घालण्यात आली आहे संबंधितांना नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास पुरेसा कालावधी नसल्याने हा एकतर्फी आदेश निर्गमित करण्यात आला आहे व उत्सव काळात ऐनवेळी डॉल्बी सुरू करण्यासाठी हट्ट धरून परिस्थिती तणावपूर्ण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो या अगोदरही विविध उत्साहामध्ये व जयंती मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टीम लावून मोठ्या आवाजामध्ये मिरवणुकी काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता त्यावेळी डॉल्बी सिस्टीम चालक मालकांना नोटीस देऊन त्यांचे समुपदेशन करून सुद्धा काही परिणाम झाला नसल्याचे दिसून आले होते म्हणून सदरील काळात सणासुदीच्या काळात व सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे होण्यासाठी व कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी या आदेशाचे पालन करणे गरजेचे आहे

# डॉनागेश लखमावार पूर्व पदावर कायम झालेले निलंबन रद्द

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

**परभणी:-** जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये जिंतूर येथील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणात आंदोलन करण्यात आल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर हाताबाहेर गेल्यानंतर चुकीच्या पद्धतीने निलंबन करण्यात आलेले जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागेश लखमावार दिनांक 2 सप्टेंबर रोजी रद्द करून महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी अनिल कुमरिये यांच्या स्वाक्षरीने पूर्वपदावर नियुक्तीचे आदेश काढण्यात आले व जिल्हा सामान्यरुग्णालय परभणी येथेच पूर्वपदावर पुनर नियुक्ती करण्यात आली आहे त्यांनी 3 सप्टेंबर गुरुवार रोजी आपल्या जिल्हा शल्य चिकित्सक पदाचा पदभार स्वीकारला परभणी येथील स्त्री रुग्णालयात जिंतूर येथील गर्भवती महिलेचा व तिच्या बाळाचा वेळेवर उपचार न झाल्यामुळे मृत्यू झाल्यानंतर डॉक्टर नागेश लखमावार यांच्यावर दिलेली जबाबदारी योग्यरीते पार न पाडल्यामुळे व कर्तव्यात कसूर केल्याचा चुकीचा आरोप करत दिनांक 13 ऑगस्ट रोजी त्यांचेवर निलंबना ची कार्यवाही करण्यात आली डॉक्टर लखमावार यांचे निलंबन मागे घेण्यात यावे याकरिता जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले.

# 33 वर्षांची परंपरा; 'अश्वमेध'चा थरार आज!

## संभाजीपेठेत दहीहंडीचा भव्य जल्लोष; अभिनेत्री प्रिया शिंदे यांची विशेष उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील संभाजीपेठ येथील महात्मा फुले चौकात शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य 'अश्वमेध दहीहंडी महोत्सवा'चा जल्लोष रंगणार आहे. स्थायी समिती सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे यंदाचे स्वरूप अधिक भव्य आणि आकर्षक करण्यात आले आहे.



गेल्या ३३ वर्षांपासून सुरू असलेली दहीहंडीची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात कायम राहणार आहे. गोविंदा पथकांचे थरारक मानवी मनोरे, दहीहंडी फोडण्याचा रोमांच, ढोल-ताशांचा गजर आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संभाजीपेठ परिसर उत्साहाने दुमदुमणार आहे.

अभिनेत्री प्रिया शिंदे ठरणार विशेष आकर्षण

यंदाच्या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे स्टार प्लसवरील 'मान के हम यार नहीं' या मालिकेसाठी प्रसिद्ध असलेल्या अभिनेत्री प्रिया शिंदे यांची विशेष उपस्थिती. त्यांच्या उपस्थितीमुळे महोत्सवाची रंगत आणखी वाढणार असून, नागरिकांसह गोविंदा पथकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. ३३ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदा नव्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरी होणार असल्याने नागरिकांमध्येही मोठी उत्सुकता आहे. शहरातील नागरिकांनी ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता महात्मा फुले चौक, संभाजीपेठ येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'अश्वमेध दहीहंडी महोत्सवा'चा थरार आणि जल्लोष अनुभवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला धर्मापुरी येथून अन्नप्रसादाची सहायता

## अडीच क्विंटल चिवडा आणि पाचशे पाण्याच्या बाटल्या रवाना

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** सकल मराठा समाजाच्या आरक्षणाच्या लढाईत अंतरवाली सराटी हे एक छोटे गाव नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचे आरक्षणाचे केंद्र बनले आहे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेटवलेल्या संघर्षाला पाठिंबा व बळ देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मदतीचा ओघ सुरू झाला आहे त्यामध्ये खारीचा वाटा म्हणून परभणी तालुक्यातून धर्मापुरी या गावांनी व सकल गावकऱ्यांनी आपल्या दातृत्वाची आणि सामाजिक बांधिलकीची एक आगळीवेगळी छाप महाराष्ट्र च्या सर्व समाजामध्ये सोडली हे उपोषणासाठी येणाऱ्या बांधवांची तहानभूक भागवण्यासाठी धर्मापुरीच्या युवकांनी अडीच क्विंटल चिवडा आणि 500 पाण्याच्या बॉटलाचा एकतापा 3 सप्टेंबर गुरुवार रोजी धर्मापुर येथून रवाना करण्यात आला धर्मपुरी ते अंतरवाली सराटी हे सुमारे 180 किलोमीटरच्या अंतर मात्र आंदोलकाच्या सेवेत कोणतेही अंतर पडू नये




यासाठी गावातील सकल मराठा समाजाच्या तरुणांनी एकत्र येत अवघ्या 24 तासात निधी गोळा केला पिकप वाहनामध्ये हा अल्पहार भरून त्याला अंतरवाली सराटीकडे हिरवा कंदील दाखवत रवाना करण्यात आले गाडी रवाना होत असताना युवकांनी दिलेल्या आरक्षणाच्या घोषणा आरक्षण आमच्या आणि एक मराठा लाख मराठा या घोषणांनी संपूर्ण धर्मपुरी परिसर भारावून गेला होता धर्मपुरी चा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संपूर्ण महाराष्ट्रभरात धर्मपुरी करांचे कौतुक केले जात असून केवळ ही सहायता नसून मराठा परिवारासाठी उभारलेला ज्वलंत लढा असल्याचे बोलले जाते येतो झाकी है अभी सब कुछ बाकी है मनात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मराठ्याची छावे घराबाहेर पडले असून उपोषण स्थळे कुणीही उपाशी किंवा तहानलेल्या राहू नये याकरिता सर्व तरुणांनी जबाबदारी स्वीकारून अन्नप्रसादाची पहिली गाडी पाठवली आहे आणि काही सहायता करण्यास धर्मापुरीकर कुठे उपस्थित युवकांनी व्यक्त केला

# 'बाप्पा माझा फक्त मातीचा' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**फुलंब्री :** दीपशिखा फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर एलिट आणि श्री संत सावता गुरुकुल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने 'बाप्पा माझा फक्त मातीचा' या संकल्पनेवर आधारित पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा शुक्रवारी (दि. ४) सकाळी १० ते १२ या वेळेत श्री संत सावता गुरुकुल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत नैसर्गिक मातीपासून



गणेशमूर्ती साकारल्या.

पर्यावरणाचे संवर्धन आणि निसर्गाप्रती असलेली जबाबदारी विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. गणेशोत्सवात पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर वाढावा आणि नैसर्गिक मातीपासून स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याची सवय लागावी, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

दीपशिखा फाउंडेशनच्या सौ. मनीषा चौधरी यांनी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून विद्यार्थ्यांना नैसर्गिक मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच घरीच मूर्तीसाठी मऊ माती तयार करण्याची सोपी पद्धतही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहाने मातीला आकार देत आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या.

गणेशमूर्ती तयार करताना नैसर्गिक साधनांचा वापर करणे आणि पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही, अशा पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती साकारल्याने त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना उरणकर, शिक्षक आप्पासाहेब चव्हाण, सुनील चौधरी तसेच शाळेतील इतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर एलिटच्या अध्यक्षा रोटे. माधुरी जोशी, रोटे. सौ. माधुरी सांगवीकर, रोटे. उत्तम शिरसाट, रोटे. डॉ. गणेश कुलकर्णी (प्रकल्प प्रमुख) यांच्यासह आयोजक संस्थांचे सदस्य उपस्थित होते.

# करंजगाव येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी; दंत, त्वचा व सर्वसाधारण आरोग्य तपासणी; आरोग्य जागृतीसाठी उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**करंजगाव :** एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने करंजगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे तसेच आरोग्यविषयक समस्या वेळीच निदर्शनास याव्यात, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.

शिबिरात शाळेतील विद्यार्थ्यांची दंत तपासणी, त्वचा तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित विविध बाबींची पाहणी करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून देणे, हा शिबिरामागील प्रमुख उद्देश होता.




या शिबिरास शाळेतील शिक्षकवृंदासह संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लाल कोट, कार्यक्रम समन्वयक सचिन लिमकर, सचिन ढडहाळे, इर्शाद सय्यद, कृष्णा सरोवर आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सर्वांगीण विकासासाठी अशा आरोग्यविषयक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

# धुतुममध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात; रात्रभर नामस्मरण, भजनाने रंगला जागर, अनेक वर्षांची परंपरा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** उरण तालुक्यातील धुतुम गावात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

धुतुम खालची आळी यांच्या वतीने शंकर मंदिरात पूजा अर्चा,अभिषेकचा मान सामाजिक कार्यकर्ते समाधान कृष्णा कटेकर व सामाजिक कार्यकर्त्या भारती समाधान कटेकर या दांपत्याला देण्यात आला. त्यांच्या शुभहस्ते सप्ताहाचा अभिषेक, पूजा अर्चा भक्तिभावाने संपन्न झाला. यावेळी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव निर्विघ्नपणे पार पडावा तसेच गावात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, यासाठी श्रीकृष्ण चरणी प्रार्थना करण्यात आली.जन्माष्टमीच्या निमित्ताने रात्रभर नामस्मरण, भजन आणि जागर करण्यात आला. सालाबादप्रमाणे दरवर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत रघुनाथ ठाकूर यांच्या घरात आयोजित करण्यात आला.यंदाही धार्मिक परंपरा आणि सामाजिक एकोपा जपत हा उत्सव उत्साहात पार पडला.



या धार्मिक सोहळ्यास दशरथ रोहिदास ठाकूर, मेघनाथ दशरथ ठाकूर, सुरेश गंगाराम ठाकूर, गोविंद नामदेव ठाकूर, यांच्यासह धुतुम खालची आळीतील ग्रामस्थ,धुतुम गावातील ग्रामस्थ,भाविक आणि मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी माजी जि. प. सदस्य वैजनाथ ठाकूर, माजी जि. प. सदस्य कुंदा ठाकूर यांनी श्रीकांत ठाकूर यांच्या घरी जाऊन श्री कृष्णाच्या मूर्तीचे मनोभावे दर्शन घेतले.भजन, नामस्मरण आणि भक्तिमय वातावरणामुळे धुतुम गावात संपूर्ण रात्र श्रीकृष्णमय झाली. अखेर सर्व उपस्थितांना श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकालाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# देहविक्री करणाऱ्या महिला व कलावंतांना विधी सेवा व शासकीय योजनांबद्दल मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने गुरुवारी (दि.३)परभणी येथे विधीविषयक सेवांबद्दल जनजागृती तसेच देहविक्री करणाऱ्या महिला व कलावंतांच्या विविध अडीअडचणी जाणून घेण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एम. सादराणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये सचिव (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) भूषण म. काळे यांनी उपस्थित महिला व कलावंतांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या मोफत विधी सेवा, कायदेशीर सल्ला व सहाय्य तसेच विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच उपस्थितांशी संवाद साधून त्यांच्या विविध अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या.




यावेळी देहविक्री करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या विविध सामाजिक, कौटुंबिक व कायदेशीर अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. महिलांनी आपल्या दैनंदिन जीवनातील विविध समस्या मांडल्या. विशेषतः त्यांच्या मुलांना आधारकार्ड तसेच रेशनकार्ड मिळविताना येणाऱ्या अडचणींचा प्रश्न महिलांनी उपस्थित केला.

तसेच, कलावंतांना भेडसावणाऱ्या विविध अडीअडचणी व शासनामार्फत मिळणाऱ्या मानधनासंदर्भातील प्रश्नांबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. पात्र कलावंतांना शासनामार्फत मिळणारे मानधन मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही व मार्गदर्शन करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी सुभाष मस्के, प्रकल्प अधिकारी, महानगरपालिका यांनी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या बचत गटाशी संबंधित विविध योजना, महिला बचत गटांना उपलब्ध असलेल्या सुविधा व योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

महिलांनी व कलावंतांनी मांडलेल्या विविध समस्या व अडचणींची नोंद घेण्यात आली. त्यांच्या समस्यांवर उपलब्ध असलेल्या कायदेशीर उपाययोजना व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे, मोफत विधी सेवा उपलब्ध करून देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911